# पुणे विद्यापीठ
# पुणे –४११००७
# महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

---

संदर्भ क्र. बी.सी.यु.डी/ओ.एस.डी/८५३ दिनांक:–३०/११/२०११.

प्रति,
मा. प्राचार्य /मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालये
व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था.

महोदय,

पुणे विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालये, मान्यता प्राप्त शिक्षण संस्था व विद्यापीठातील विविध विभागातील शिक्षकांसाठी महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, पुणे विद्यापीठ अंतर्गत संशोधन प्रकल्प योजना राबविली जाते. सन २०१२ साठी नविन संशोधन प्रकल्प दिनांक १० नोव्हेंबर २०११ ते ३० नोव्हेंबर २०११ या कालावधी दरम्यान Online पध्दतीने मागविण्यात आले होते. सदर संशोधन प्रकल्प Online पध्दतीने पाठविण्याची अंतिम तारीख १० डिसेंबर २०११ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. Online पध्दतीने भरलेला संशोधन प्रकल्पाचा अर्ज, अपलोड केलेल्या कागदपत्रांसह (हार्ड कॉपी) दिनांक १५ डिसेंबर २०११ पर्यंत ओ.एस.डी/बी.सी.यु.डी कार्यालयात जमा करावेत. दिनांक १५ डिसेंबर २०११ नंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

संशोधन प्रकल्पाबद्दलची सविस्तर माहिती BCUD Online संकेतस्थळावर Research Online या शिर्षका अंतर्गत उपलब्ध आहे. पुणे विद्यापीठा तर्फे प्रत्येक शिक्षकांसाठी User Name व Password संबंधीत महाविद्यालया मार्फत देण्यात येत आहेत. User Name व Password तयार करण्या संदर्भातील विस्त्रुत माहिती BCUD Online संकेतस्थळावर वर प्रत्येक महाविद्यालयाच्या अकाऊंट Teacher Profile System या Link अंतर्गत उपलब्ध आहे. या संदर्भात तांत्रिक मदत लागल्यास ०२०–२५६०१३८८ येथे संपर्क साधावा.

पुणे विद्यापीठाच्या विविध विभागातील शिक्षकांनी १४ मार्च २०११ बी.सी.यु.डी च्या मेल नुसार १५ मार्च २०११ रोजी पाठविण्यात आलेल्या पत्रानुसार त्यांना देण्यात आलेल्या User Name व Password च्या सहाय्याने प्रकल्प पाठवावेत.

कळावे,

डॉ. रविंद्र जायभाये
ओ.एस.डी/बी.सी.यु.डी